DEGLOOR COLLEGE, DEGLOOR, Dist.Nanded

IMPACT FACTOR 3.47

ISSN 2349-1027

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : IX, Vol. V

Year- V,Bi-Annual(Half Yearly)

(Aug. 2017 To Jan. 2018)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website
www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

EDITOR IN CHIEF

Dr. Ambuja Malkhedkar
Gulbarga, Dist. Gulbarga
(Karnataka)

EXECUTIVE EDITORS

Dr. Nila Bhosale
Dept. of Hindi,
Govt. Ist Grade College,
Kamlapur, Dist.Gulbarga (Karnataka)

Dr. Balaji G. Kamble
Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur (M.S.)

DEPUTY EDITOR

Dr. Gururaj V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur (M.S.)

Dr. Balaji D. Ingale
Principal
Sharadchandra Mahavidyalaya,
Naigaon, Dist. Nanded (M.S.)

CO - EDITOR

Dr. Sanjivani B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Sharadchandra Mahavidyalaya,
Naigaon, Dist. Nanded (M.S.)

Sandipan K. Gayake
Dept. of Sociology,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr. Sivappa Rasapali
Dept. of Chemistry & Biochemistry,
UMASS, Wesport Road,
Dartmouth, MA (U.S.A.)

Dr.Eknath J. Helge
Head, Dept. of Commerce,
Jijamata Mahavidyalaya,
Buldhana, Dist. Buldhana (M.S.)

Dr.Sarjerao R. Shinde
Principal
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

Dr.Satyenkumar P. Sitapara
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

Dr. Arun Kumbhar
Head, Dept. of Economics,
Arts & Commerce College,
Nesri, Dist. Kolhapur (M.S.)

Dr. Allabaksha Jamadar
Head, Dept. of Hindi,
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur ( M.S. )

Dr. Sakharam V. Kakade
Dept. of Zoology,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. Y. K. Thombare
Principal
N. S. S. College,
Dodamarg, Dist. S.Durg (M. S.)

Dr. Vinod Veer
Head, Dept. of Geography,
Kishan Veer College,
Wai, Dist. Satara (M.S.)

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

ISSN 2349-1027
Aug. 2017 To Jan. 2018
IMPACT FACTOR 3.47
Issue - IX, Vol.- V
IWR

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Study on Traditional Medicinal Plants used in Beed Districts (MS) India. (Part – II)<br>**Dr. M.G. Fawde** | 1 |
| 2 | Magical Realism : Origin and History<br>**Ajay Kale** | 6 |
| 3 | Evaluation of Railway Network Accessibility in Akola District (Maharashtra State)<br>**Dr. Anilkumar Prasad** | 11 |
| 4 | Socio-Economic Status of Inter-Collegiate Kabaddi & Kho-Kho Players<br>**Sambhaji Kadam** | 17 |
| 5 | बकरी : समसामायिक युगीन अनुभूति की अभिव्यक्ति<br>**डॉ. सुनिल मावस्कर** | 23 |
| 6 | शमशेर बहादुर सिंह के काव्यभाषा की बहुआयामिता<br>**डॉ. तीर्थराज राय** | 27 |
| 7 | महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व जमातीतील अंधांचा लोकसंख्या शास्त्रीय अभ्यास (जनगणना २०११)<br>**कैलास जगन्नाथ शिवदे, डॉ. सुरेश दगडू पाटील** | 32 |
| 8 | जी. एस. टी. मधून पेट्रोल डिझेल वगळण्याची कारणे<br>**रुपेश म. कुऱ्हेकर** | 47 |
| 9 | महात्मा बसवेश्वरांच्या संकल्पनेतील राज्यव्यवस्था<br>**डॉ. रत्नाकर बी. लक्षटे** | 51 |


Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



IMPACT FACTOR 3.47
ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Issue : IX, Vol. V
Aug. 2017 To Jan. 2018
www.irasg.com

Research Paper 9 Political Science

# महात्मा बसवेश्वरांच्या संकल्पनेतील राज्यव्यवस्था

**डॉ. रत्नाकर बी. लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

आजच्या २१ व्या शतकात जगाची वाटचाल जागतीक शासन व जागतिक राज्यव्यवस्थेच्या दिशेने होत आहे. राजकीय व्यवस्थेच्या ह्या स्थित्यंतरास समाज व अर्थव्यवस्थेत घडलेल्या घडामोडी कारणीमुत आहेत. बसवेश्वरांनी आपल्या चमत्कारिक दिव्यवलयी नेतृत्वाच्या साह्याने समाजव्यवस्थेच्या अनैतीक रुढी, प्रथा, परंपरावर घाव घातला. परिणामी समाज व राज्यवव्यस्थेच्या स्वरुपात बदल झाला. समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता व राष्ट्रीय एकात्मता हे राज्यव्यवस्थेचे उद्दिष्ट बनले. लोकांची राजकारण, राजकीय घडामोडी बाबतची जाणीव व जागरुकता वाढली. राजकीय सहभागाच्या प्रक्रीयेत वाढ झाली. तत्कालीन राजकीय श्रेष्ठींच्या स्वहितवादी राजकारणाला चेक बसला. राजकीय संस्कृतीच्या परिमाणात बदल झाला. महात्मा बसवेश्वरांनी समाज, अर्थ व राज्यव्यवस्थेच्या समग्र परिवर्तनासाठी मांडलेल्या विचारातुनच राज्यव्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट होते. महात्मा बसवेश्वरच्या संकल्पनेतील राज्यव्यवस्था खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते.

अ. प्रजाप्रभुत्व (लोकशाही)

ब. समाजवाद

**अ) प्रजाप्रभुत्व (लोकशाही) :**

राज्यशास्त्रात अनेक राजकीय संकल्पना, राजकीय विचार व राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला जातो. वर्तमानात लोकशाही ही अत्यंत लोकप्रिय राज्य व्यवस्था आहे. लोकशाही या शासनव्यवस्थेचा प्रथम उदय इंग्लंडमध्ये १३ व्या शतकात झाला. १२१५ ला इंग्लंडचा राजा जॉन ने "मॅग्नाचार्टा" सनदेवर हस्ताक्षर करुन जनतेच्या मागण्यांना, हक्कांना मान्यता दिली. ज्यामुळे जनता व संसदेच्या सार्वभौमत्वाच्या इतिहासाला सुरवात झाली. स्वातंत्र्यानंतर भारतानेही लोकशाहीचा शासन व्यवस्था म्हणुन स्विकार तर केलाच पण त्याहीपुढे जावुन लोकशाहीचा जीवनमार्ग, समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था म्हणुन स्विकार केला.



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



भारताने लोकशाहीचा शासनव्यवस्था म्हणुन स्विकार का केला? याची कारणमिमांसा करताना स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु म्हणतात " हमने संसदीय लोकतंत्रात्मक प्रणाली को सोच-समझकर ही चुना है, हमने इसे केवल इसी कारण नही चुना की हमारे सोचने का तरीका कुछ हद तक ऐसा ही रहा बल्कि इस कारण भी की यह प्रणाली हमारी पुरातन परंपराओ के अनुकूल है । स्वाभाविक है कि पुरातन परंपराओ का पुरातन स्वरुप मे नही. अपितु नई परिस्थितीयों और नए वातावरण के अनुसार बदलकर अनुसरण किया गया है. इस पध्दती को चुनने का एक कारण यह भी है की हमने देखा की अन्य देशो में विशेष रुप से युनायटेड किंगडम में यह प्रणाली सफल रही है।" पंडित नेहरुंच्या या विचारातून भारतीय परंपरेत लोकशाहीसपूरक विचार असल्याचे दिसून येते. कदाचित त्यांचा निर्देश महात्मा गौतम बुद्ध व महात्मा बसवेश्वर विचाराकडे असावा. महात्मा बसवेश्वरांच्या काळात जागतिक व भारतीय पातळीवर राजप्रभुत्वाची राज्य व्यवस्था होती. १२ व्या शतकात बसवेश्वरांनी राजप्रभुत्ववादी व्यवस्थेला नाकारुन लोकशाहीच्याही पुढे जाणारा प्रजाप्रभुत्ववादी व्यवस्थेचा विचार मांडला. संप्रदायबध्द समाजात प्रजाप्रभुत्ववादी पर्यायी समाज रचना निर्माण केली. प्रजाप्रभुत्व म्हणजे थोडक्यात 'प्रत्यक्ष लोकशाही' होय. तसेच 'आमच्या गावात आमचे सरकार' हयाऐवजी 'आमच्या गावात आम्हीच सरकार' होय. समाजवादी व्यवस्थेस पुरक ठरणारा प्रजाप्रभुत्वाचा विचार आहे. महात्मा बसवेश्वराच्या प्रजाप्रभुत्ववादी व्यवस्था व शासनाचा संपूर्ण डोलारा समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधूता या मानवी मुल्यांवर आधारित आहे. महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात प्रजाप्रभुत्ववादी व्यवस्थेच्या आड येणाऱ्या अंधश्रध्दा,बहुदेवोपासना, बहुजनांची गुलामगिरी, पुरोहीतशाही, सरंजामशाही इ.तत्वा विरोधी विचार मांडले. प्रजाप्रभुत्वाचा विचार प्रजासत्ताकापेक्षा श्रेष्ठ होय. कारण प्रजाप्रभुत्वात सत्तेच्या प्राप्तीचा संघर्ष नसतो. सामाजिक व आर्थिक प्रजाप्रभुत्वाशिवाय राजकीय प्रजाप्रभुत्व अस्तित्वात येवू शकत नाही, याची जाण बसवेश्वरांनी होती. म्हणूनच राजसत्ताक व्यवस्थेत महामंत्री असताना सामाजिक व आर्थिक प्रजाप्रभुत्वासाठी 'इष्टलिंग' 'कायक वे कैलास' 'दासोहा' चे तत्वज्ञान वचनातून ब्सवेश्वरांनी मांडले. कल्याणमधील प्रजाप्रभुत्ववादी व्यवस्थेत वावरणारा नागरिक स्वार्थ, अहंभाव षड्रिंपू इ. विकारापासून दूर गेला होता. जेथे सत्ता असते तेथे स्वार्थ, शोषण,अहंपणा, हिंसा असते. प्रजासत्ताक रुपी तत्वज्ञानास व्यवहाराची जोड असलेच याची शक्यता नसते. पण बसवेश्वरांनी प्रजाप्रभुत्वास व्यवहाराची जोड होती. बसवेश्वरांच्या कल्याणनगरात सर्व समान होते. सर्वांना समान हक्क होते. सर्व समप्रमाणात कर्तव्य बजावत असत. सर्वांना माणूस म्हणून समान दर्जा व एक प्रतिष्ठा होती. सर्वांच्या अंतर आत्म्यात ईश्वरांच्या अंश मानणारी व्यवस्था होती. राजकीय सहभागाची संधी होती. राजप्रभुत्ववादी व्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी प्रत्येकात व्यवस्थेविषयी सामुहिक जबाबदारी निर्माण करण्याचे काम बसवेश्वरांच्या विचाराने केले. प्रजाप्रभुत्वात सकल जीवात्म्याच्या कल्याणाशी निगडीत व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेत अंत्यजासही व्यवस्थेच्या शीर्षस्थानी विराजमान होण्यास पुरक समतावादी तत्वज्ञान मांडले. संधीतून समानता,समानतेतून विकास हे समीकरण बसवेश्वरांनी साधले होते. बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्वात सर्वच मालक होते.

प्रजाप्रभुत्वाचा विचार व्यक्तीप्रभुत्व व धर्मप्रभुत्वास नाकारणारा होता. एकदेवोपासना, कायक, दासोह,अनुभवमंटप, वैचारिकता, प्रज्ञा समता व स्वातंत्र्य हे प्रजाप्रभुत्वाचे आधार आहेत. कल्याण हे माझे



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



राज्य आहे; मी या राज्याचा एक महत्वाचा घटक आहे; या राज्यानिर्मितीत माझ्या ही योगदानाची गरज आहे; हा राज्याप्रती एकात्मता, एकनिष्ठता व प्रेमाचा भाव जनतेत वचनांच्या माध्यमातून रुजवला. बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्वात शासनाच्या दृष्टीने सर्व जनता समान आहे. अध्यात्मिक प्रजाप्रभुत्वास मान्यता दिली. सर्वांना पुजा करण्याचे स्वातंत्र्य दिले. सर्वसामान्य जनता व शासन दरबारी काम करणाऱ्यातील भेदभावाची दरी नाकारली. राज्यशक्तीचे प्रजाप्रभुत्व शक्तीत रुपांतर केले. बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्ववादी व्यवस्थेतील सर्व सदस्य स्वतःस भक्त व शरण म्हणवून घेत असत. दैनंदिन सामाजिक जीवन जगताना प्रजेत एकमेंकाविषयी कळवळा होता. सामाजिक वर्तन व विचारात साम्यता होती. जातीय, आर्थिक,धार्मिक संघर्ष नसून अनुभवमंटपातून वैचारिक संघर्षाचे द्वंद्व चालत असत. जे प्रजाप्रभुत्वास पोषक होते. अनुभवमंटपातून राजकीय प्रजाप्रभुत्वाचा विचार मांडला. भारतीय संविधानातील प्रजाप्रभुत्वाचा विचार १२ व्या शतकात रुजवला. बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्ववादी व्यवस्थेत कायक (श्रमप्रतिष्ठा) आहे. सामाजिक जबाबदारीची जाणीव विकसीत करण्यासाठी कायकास दासोहाची साथ आहे. या दोन्हीमुळे सामाजिक,आर्थिक, राजकीय, शैक्षणिक,सांस्कृतिक,धार्मिक नैतिक व अध्यात्मिक क्षेत्रात प्रजाप्रभुत्वास पोषक वातावरण निर्माण झाले. महात्मा बसवेश्वरांचे वचनसाहित्य प्रजाप्रभुत्वाची खाणंच आहे. बिज्जलासारख्या सरंजामदाराच्या दरबारात राहून प्रजाप्रभुत्वा सारखे कठीण वाटणारे विचार मांडले. ज्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या अंत्यजाविषयी आपलेपणाचा विचार रुजला.

"मोठा होण्याची इच्छा नाही,पामर रहाण्याची इच्छा आहे,
खाली बसल्यावरच गाय दूध देणार ना ?
मोठा होऊन नरकात तळमळण्याची इच्छा नाही.
तुमच्या शरणांच्या चरणी पामर होऊन राहू द्यावे."

राज्यकर्त्यावर्गाने स्वतःस सर्वसामान्य जनतेपेक्षा वेगळे किंवा मोठे मानल्यास प्रजाप्रभुत्व येत नसते. स्वतःस मालक समजणारा राज्यकर्ता वर्ग नरकात जातो. राज्यकर्त्यावर्गाने सर्व सामान्य जनतेच्या (शरण) सोबत राहूनच प्रजाप्रभुत्वाची वाट सुकर करावी असा उपदेश केला. 'भारतीय (प्रजाप्रभुत्व) लोकशाहीची ऐतिहासिक वाटचाल' या शिर्षकाखाली जेव्हा-जेंव्हा लिखान होईल तेंव्हा-तेंव्हा बसवेश्वरांच्या प्रजाप्रभुत्ववादी विचारांची नोंद सुवर्णक्षरांने करावी लागेल डॉ.के. बसवेश्वराच्या च्या मते "हे बसवण्णा होते की, ज्यांनी सर्वप्रथम भारतीय समाजाला लोकशाही संस्कृतीचा भक्कम आधार दिला."

**ब) समाजवाद :**

भारतात व भारताच्याही बाहेर समाजवादी राज्यव्यवस्थेचे समर्थन प्लेटो, रॉबर्ट ओवेन, कार्ल मार्क्स, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे. समाजवाद हा Socialism या इंग्रजी शब्दाचा पर्यायवाची शब्द आहे. Socialism या शब्दाची उत्पत्ती '"Socias" या शब्दापासुन झाली, ज्याचा 'समाज' असा अर्थ होतो. समाजवादाचा संबंध समाज आणि त्याच्या सुधारणेशी निगडीत आहे. सेलर्सच्या मते "समाजवाद एक ऐसी प्रजातंत्रात्मक विचारधारा है जिसका उद्देश समाज में एक ऐसी आर्थिक व्यवस्था लाना है जो किसी भी व्यक्ति को अधिकतम सम्भव न्याय और स्वाधीनता प्रदान कर सके" समाजवादात प्रामुख्याने शोषणमुक्त व समताधिष्ठित समाज, संपत्तीचे विकेंद्रीकरण, आर्थिक समता, दुर्बल



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



घटकांना संरक्षण देणे, स्त्री स्वातंत्र्य, मानवी मुल्यांना प्राधान्य, मानवाची समानता व न्यायपुर्ण सामाजिक व्यवस्था निर्माण करणे इ. चा समावेश असतो. महात्मा बसवेश्वरांनी सर्वसामान्य मानवाला समजेल अशा 'कक्क' मध्ये समाजवादी राज्यव्यवस्थेस पुरक ठरणारा विचार मांडला. बहुजन स्त्री व पुरुषांना वैदीक धर्मांच्या वर्चस्वापासुन मुक्त करणे, स्वतःच्या उद्योगाला (श्रमाला) कमी न लेखता श्रमाचे श्रेष्ठत्व जपुन नेहमी सत्य, शुध्द, कायक करत रहाणे; दासोहासाठी समाजबांधवांना प्रेरित करणे ही बसवेश्वरांच्या समाजवादी राज्यव्यवस्थेची त्रिसुत्री व आत्मा आहेत.

तत्कालीन उच्चवर्णीय व पुरोहितांनी बहुदेवोपासना यज्ञ व मंदिर संस्कृतीच्या नावावर बहुजनांचे बौध्दिक व आर्थिक शोषण केले होते. बसवेश्वरांनी समाजवादास प्रतिकुल असणाऱ्या संस्कार व संस्कृतीविरोधी विचार मांडले. धार्मिक स्वातंत्र्य व समतेसाठी सर्व समान आहेत. सर्वांना स्वःहाताने ईश्वरांची पुजा करण्याचा हक्क देणारे वचनसाहित्य लिहीले. इष्टलिंगाच्या साह्याने बहुजन स्त्री व पुरुषांनी मंदिरात न जाता घरातच बसुन ईश्वरांची साधना करावी, देहलाच देवालय मानावे. धर्मांच्या नावावर शोषन होवु नये म्हणुन इष्टलिंगाच्या साह्याने स्त्री व पुरुषांचे धार्मिक स्वातंत्र्य व अनुभवमंटपातुन अभिव्यक्ति स्वातंत्र्यास मान्यता देवुन समाजवादास पुरक ठरणाऱ्या विचारांचे समर्थन केले. महात्मा बसवेश्वरांच्या समाजवादी राज्यव्यवस्थेतील कायक वे कैलास व दासोह हे दोन अतिशय महत्वाचे विचार आहेत. आर्थिक समता व संपत्तीच्या विकेंद्रीकरणासाठी 'कायक वे कैलास' व 'दासोह' या विचाराचा अतिशय जवळचा संबंध आहे. राज्यातील नागरिकांना स्वावलंबी व आर्थिक दृष्ट्या समृध्द आणि देशाला 'सुजलाम सुफलाम' बनवणारा हा विचार समाजवादाशी साधर्म्य साधणारा आहे. सर्व कायक समान आहेत. सर्वांनी कायक (श्रम) केलेच पाहिजे. हा विचार समता व बंधुतेची प्रचिती देणारा आहे. कायकाने सुख, समृध्दी, समाधान, शारिरीक आणि मानसिक शांती मिळते. सर्व प्रजेला सुखी करणारा कायक हा समाजवादी सिध्दांत आहे. ८५० वर्षांपुर्वी महात्मा बसवेश्वरांच्या श्रमाच्या महात्म्यातुन समाजवादी राज्यव्यवस्था निर्माण केली. परिश्रमाचे महत्व पटवुन देताना बसवेश्वर म्हणतात...

"भक्तिविशेष करण्यासाठीच दहा बोटे आहेत
त्याद्वारे श्रम केल्यास आपल्यासाठी
आपल्या प्रयत्नांसाठी ते लाभदायक ठरे."

'कायक वे कैलास' हा जीवनमंत्र कल्याण भुमित निनादला. कर्तव्यबुध्दीने, नित्याने प्रामाणिकपणे श्रम केल्यास पृथ्वीवरच नंदनवन, कैलास, स्वर्ग निर्माण करता येते. कायक हा आर्थिक विकास विकासास प्रेरणादायी ठरणारा विचार आहे. बसवेश्वरांच्या कायकामुळेच तत्कालीन समाजात न्याय व समतेचा विचार रुजला. १८ व्या शतकातील समाजवादी विचारवंत कार्ल मार्क्सने श्रमिकांच्या हिताची जोपासना करणारे साम्यवादी तत्वज्ञान मांडले. तेच विचार १२ व्या शतकात बसवेश्वरानी कायकाच्या माध्यमातुन मांडले. कायकामुळे बसवेश्वरांच्या समाज व राज्यातील मागणाऱ्यांची संख्या कमी होवुन, देणाऱ्यांची संख्या वाढली. सर्वांची आर्थिक स्थितीत सुधारणा झाली. पंडित नागभुषण शास्त्री ह्या मते बसवेश्वरांनी प्रतिपादन केलेल्या कायकतत्वाच्या प्रसारामुळे, स्वातंत्र्य, समता नि बंधुता ही तत्वे गतीमान होतात. कायकामुळे मनुष्य स्वतंत्र बनतो, बरोबरीने काम केल्यामुळे समता व बंधुभाव उत्पन्न होतो." समाजवाद व मानवी



Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR



मुल्यांचा अतिश्य जवळपास संबंध असतो. त्याचप्रमाणे बसवेश्वरांच्या समाजवादी व्यवस्थेत मानवी मुल्यांना प्रथम प्राधान्य होते. सामाजिक व राजकीय व्यवस्थेच्या स्वास्थ्यासाठी मानवाचे सदैव कार्यमग्न रहाणे हितावह असते. कायकामुळे व्यक्ती सदैव कार्यमग्न राहू लागली.

महात्मा बसवेश्वरांच्या समाजवादी व्यवस्थेतील 'दासोह' हे अतिशय महत्वाचे तत्व आहे. महात्मा बसवेश्वरांचे 'दासोह' सिध्दांत महात्मा गांधीच्या समाजवादी व्यवस्थेतील विसवस्त संकल्पने' च्या पुढची पायरी आहे. 'दासोह' आर्थिकदृष्टया दुर्बल व कमकुवत घटकांना आर्थिक संरक्षण देणारा सिध्दांत आहे. 'दासोह' आर्थिक समता व आर्थिक कल्याणाचा विचार आहे. वस्तु व सेवांचे समान वितरण (वाटप) या तत्वज्ञानावर दासोहाचे तत्वज्ञान आधारलेले आहे. 'दासोह' संपत्तीचे वितरण समरुपात करणारा विचार आहे. दासोह आर्थिक लोकशाहीचे प्रतीक आहे. औद्योगीक लोकशाहीस पुरक ठरणारा विचार म्हणजेच दासोह होय. व्यक्तिने कमावेला पैसा आणि केलेले उत्पन्न यावर संपुर्ण समाजाची मालकी आहे. व्यक्तिने स्वतःच्या अतिरिक्त संपत्तीचा उपयोग समाजासाठी करावा. बसवेश्वरांचे दासोह तत्वज्ञान प्लेटोचा साम्यवाद, कार्ल मार्क्सची आर्थिक समता, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्य समाजवादाशी मिळताजूळता किंबहूना त्याहीपेक्षा श्रेष्ठ आहे. आपणासोबत इतरांच्याही जीवनात आनंद, सुख व समृध्दीची पालवी फुलवणारा विचार दासोहात आहे. दासोहाने समाजाच्या आर्थिक कल्याणाचा मार्ग सुकर केला.कोणतीही हिंसा न करता समाजाच्या उदरनिर्वाहाचा, रोजगाराचा व शोषणाचा प्रश्न दासोहाच्या तत्वज्ञानाने सोडवला. सामाजिक न्यायाची पुर्तता करणारा विचार दासोहात आहे. गदगच्या तोंटदार्य महास्वामीजीच्या मते "बसवण्णा हे जगातील पहीले समाजवादी विचारवंत होय."

"नाही का बोलावी कावळा? बघता एक घास
आपल्या नात्या-गोत्यास मारुनी हाक,
नाही का बोलावी कोंबडा? पाहता एक घास,
आरवुनी बोलवी सर्वास, आपल्या कुळास
शिवभक्त होऊनी भक्तिपक्ष नसल्यास
त्या कावळया-कोंबडयाहुनही अतिहीन
कुडलसंगमदेवा."

पशु व पक्षी जर आपण मिळवलेले अन्न आपापसात वाटुन खात असतील , आपण तर शिवभक्त (मानव) आहोत. आपणास जर पक्ष्याप्रमाणे वाटुन खाण्याची सवय नसेल तर आपण पक्ष्यापेक्षाही हीन दर्जाचे आहोत. मधमाशी मधुकणाचा संचय करुन मधाची पोळी बनवते. तो मध स्वतः खाऊन इतरांनाही खाण्यास देते. त्याचप्रमाणे मानवानेही स्वतः संचय केलेल्या संपत्तीया गरजेपुरता भाग आपणाकडे ठेवावा व जास्तीची संपत्ती समाजातील गोर, गरीबांच्या कल्याणासाठी वापरावी. संपत्तीच्या संग्रही व हव्यासी प्रवृत्तीमुळे राज्य व समाज भ्रष्टाचाराच्या मार्गाने जाते. राज महालात निद्राअवस्थेत असताना पत्नीचे दागिने चोरणाऱ्या चोराला पाहुन बसवेश्वर म्हणतात...

"चोराच्या घरी मोठा चोर आला !
तर तो कुडलसंगमनाथच असणार,



Scanned by CamScanner

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



दुसरा नाही.
काढुन दे चांडाळणी
माझ्या देवाचा हात दुखतो आहे."

या वचनातुन बसवेश्वर समाजवादी व्यवस्थेस पुरक ठरणारा विचार सांगुन संपत्तीच्या (सोने) आकर्षणाविषयीचा पत्नीचा विचार अयोग्य असल्याचे सांगतात. समाजाला समाजवादाच्या दिशेने नेताना प्रत्येक नागरिकाने संपत्तीच्या संग्रहाचा हव्यास टाळावा. ज्याची सुरुवात बसवेश्वर स्वतः व पत्नी पासुन करतात. संपत्तीचा अधिकचा संग्रह करणाऱ्या पत्नीस चोर म्हणुन संबोधतात. संपत्तीचे न्याय्य वितरण हा समाजवादाचा पाया आहे. संपत्तीच्या समान वितरणानेच समाजातुन चोरी, लुटमार, कुपोषण हे प्रश्न मिटतील असे समाजवादी व्यवस्थेस पुरक ठरणारे तत्वज्ञान बसवेश्वरांनी १२ व्या शतकात सांगितले. मानवतावाद, नैतिकता इ. मार्गाने समाजवादी व्यवस्था निर्माण केली. बसवेश्वरांच्या दासोह, कायक वे कैलास, इष्टलिंग, अनुभवमंटप इ.मुळे समाजवादी व्यवस्थेसमोरील सर्व अडथळे नष्ट झाले. मानवता, समता, बंधुता व एकात्मतेची भावना समाजात रुजली. महात्मा बसवेश्वरांची समाजवादी राज्यव्यवस्था शोषणमुक्त समाजासाठी पुरक आहे.

## संदर्भ सूची :-


१) कृष्णा मेनसे (तृतीयावृत्ती २००५) : महात्मा वसवेश्वर ते ज्ञानेश्वर - एक चिंतन - लोकवाङ्मय गृह, मुंबई -

२) संपादक - डॉ.एम.बि.कोट्रशेट्टि (प्रथमावृत्ती - १९७६) : भक्ति भंडारी बसवेश्वर के वचन - कन्नड अध्ययनपीठ कर्नाटक विश्वविद्यालय - धारवाड,

३) चंद्रशेखर वस्त्रद (अनुवादक-डॉ रत्नशिला गुरुडी,प्रा.संध्या देशपांडे) (प्रथमावृत्ती २००७) : मानवतावादी बसवण्णा-डॉ. चंन्नबसव पट्टदेवरु प्रतिष्ठाण - हिरेमठ संस्थान भालकी

४) एम.चिदानंदमूर्ती (अनुवादक - रविंद्र किम्बहूणे) (१९९१) : श्री बसवेश्वर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली,

५) राजेंद्र जिरोबे (१९८३) : बसवेश्वरांची वचनामृत - श्री मृत्युंजय शरण साहित्य प्रचारक संघ, मुंबई,

६) ॲड.जे.के.पाटील (१९९६) : महामानव बसवेश्वर : ऐतिहासिक चरित्र व वीरशैव धर्म - कन्नड संशोधन संस्था कर्नाटक विद्यापीठ धारवाड,

७) संपादक डॉ.सुधाकर मोगलेवार (३० सप्टेंबर २००५) : वीरशैव बसवेश्वर - खंड २, भ.म.ऊर्फ भाऊ अनवाणे, अ.भा.मराठी वीरशैव साहित्य मंडळ, नागपूर.

८) सिध्दराम पुजारी (१० ऑगस्ट २००५) : वचन धर्मसार, बसव चेतन प्रकाशन, मिरज

९) डॉ.लोहीत डी. नायकर (प्रथमावृत्ती २००७) : बसव आणि मानवी हक्क, बसव समिती बेंगलोर.

१०) डॉ.सुधाकर मेनकुदळे (२००९) : १२ व्या शतकातील आद्यसमाजसूधारक महात्मा बसवेश्वर - महाराष्ट्र बसव परिषद भालकी,.




Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner